# Study Circle Career Development Institute

# General Studies
# Paper - II

**A**

**Time : 2 Hrs.** **Marks : 200**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 80 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्याच विषयाचे प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आले आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

* **पुढील उताऱावाचून त्यावर आधारित १ ते ५ प्रश्नांची उत्तरे द्या :**

१९ व्या शतकाचा उत्तरार्ध आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्ध या १०० वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रात ज्या काही सामाजिक परिवर्तनाच्या सुधारणांच्या चळवळी आकाराला आल्या त्यामध्ये अनेक नेत्यांनी माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणावर लक्ष केंद्रित केलेले आढळते. या नेत्यांमध्ये न्या. महादेव गो. रानडे, विष्णूशास्त्री चिपळूणकर, बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, नाम. गोपाळ कृष्णा गोखले आदींचा उल्लेख करावा लागेल. परंतु, महात्मा फुले यांनी १८८२ मध्ये हंटर कमिशनला जी साक्ष दिली, त्यामध्ये १२ वर्षांपर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करावे, असा जोरदार आग्रह धरला होता. १५ एप्रिल १९२० रोजी नाशिक येथील श्री. उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीच्या पायाभरणी समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना छत्रपती शाहू महाराज म्हणाले होते; खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी जू लादले आहे ते झुगारून देण्याची शक्ती समाजाच्या अंगी येण्यात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरूरी आहे.

शाहू छत्रपतींनी कोल्हापूर संस्थानाचा राज्यकारभार हाती घेण्यापूर्वी कोल्हापुरात उच्च शिक्षण आणि माध्यमिक शिक्षणासाठी राजाराम कॉलेज आणि राजाराम हायस्कूल कार्यरत होते. कोल्हापूर इलाख्यात प्राथमिक शाळांची संख्या २२४ इतकी होती. परंतु, वरील सर्व ठिकाणी विद्यार्थी हे बहुसंख्य उच्चवर्णीयच होते. बहुजनांच्या जीवनात ज्ञानप्रकाशाची किरणे जलद गतीने पोहोचावीत म्हणून त्यांनी काही ठोस निर्णय घेऊन तत्काळ अंमलबजावणीही सुरू केली.

अ) प्रथम त्यांनी २० मे १९११ रोजी १५ टक्के विद्यार्थ्यांना संपूर्ण फी माफीचा नियम केला. परंतु, त्याचा फायदा केवळ उच्चवर्णीयांनाच होतो आहे हे लक्षात येताच त्या १५ टक्के पैकी निम्मे विद्यार्थी मागास समाजातील असावेत असा नियम केला.

ब) खेड्यात एक तरी प्राथमिक शाळा असली पाहिजे आणि गावात देवालय बांधताना त्याच्या उजव्या बाजूस शाळेसाठी सोपा ठेवावा असा नियम ९ जुलै १९१७ रोजी खास केला. इतकेच नव्हे तर देवस्थानचा खर्च भागून उरलेली रक्कम शाळेसाठी वापरली जावी अशीही नियमात तरतूद केली गेली.

क) ३० सप्टेंबर १९१७ रोजी कोल्हापूर संस्थानात मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. त्यानुसार ४ मार्च १९१८ या दिवशी शाहू छत्रपतींच्या शुभ हस्ते कोल्हापूर संस्थानामधील चिखली या गावी अशा प्रकारची पहिली शाळा सुरू झाली.

प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करूनही विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीचे प्रमाण वाढते आहे, हे लक्षात येताच शाहू छत्रपतींनी गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालकांना महिना १ रुपया दंड आकारण्यास सुरुवात केली. परंतु, शेती हेच बहुजनांच्या जीवन निर्वाहाचे प्रमुख साधन आहे, हे विचारात घेऊन त्यांनी शेतीच्या कामासाठी गैरहजर राहणार्या विद्यार्थ्यांच्या पालकांना दंड माफ करण्याची या कायद्यात तरतूद करून शाहू छत्रपतींनी राजा हा केवळ 'शासक' नसतो तर तो खराखुरा जनतेचा 'सेवक' असतो हे येथेही दाखवून दिले होते.

मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी देवस्थान फंडातून २,००० रुपये आणि दरबार खजिन्यातून ८०,००० रुपयांची मंजुरी २५ जुलै १९१७ रोजी दिलेली पाहावयास मिळते. १९१८ साली मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण या योजनेची प्रत्यक्ष कार्यवाही झाली तेव्हा २७ प्राथमिक शाळांमधून १,२९६ विद्यार्थी शिक्षण घेत होते, तर १९२२ साली याच शाळांची संख्या ४२० इतकी होऊन त्यामध्ये २२,००० हून अधिक विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत होते. ॲनी बेझंट यांच्या मद्रास येथील थिऑसॉफिकल सोसायटीत काम करणारे वासुदेव द. तोफखाने आणि गंगाधर दीक्षित या दोन धडपड्या ब्राह्मण तरुणांना एक आदर्श शाळा काढण्यासाठी शाहू छत्रपतींनी आर्थिक मदत दिली. त्यामधूनच 'भक्ती ईश्र्वराची आणि सेवा मानवांची' हे घोषवाक्य डोळ्यासमोर ठेवून ३ सप्टेंबर १९१७ रोजी कोल्हापुरात 'विद्यापीठ हायस्कूल' सुरू झाले.

---

१. राजा हा केवळ 'शासक' नसतो तर तो खराखुरा जनतेचा 'सेवक' असतो हे शाहू महाराजांच्या कोण्त्या धोरणात दिसून येते ?

अ. संपूर्ण फी माफी मिळणाऱ्या १५ टक्के पैकी निम्मे विद्यार्थी मागास समाजातील असावेत असा नियम केला.

ब. देवस्थानचा खर्च भागून उरलेली रक्कम शाळेसाठी वापरली जावी असा असा नियम केला.

क. गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालकांना महिना १ रुपया दंड आकारण्याचा नियम केला.

ड. शेतीच्या कामासाठी गैरहजर राहणार्या विद्यार्थ्यांच्या पालकांना दंड माफ करण्याची तरतूद

वरीलपैकी कोणते विधाने बरोबर आहेत ?

(1) अ, ब आणि क (2) ब आणि क (3) क आणि ड (4) वरील सर्व

---

२. १२ वर्षांपर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करावे, असा जोरदार आग्रह कोणी धरला होता ?

अ. गोपाळ गणेश आगरकर

ब. महात्मा फुले

क. शाहू छत्रपती

वरीलपैकी कोणती तरतूद बरोबर नाही ?

**पर्यायी उत्तरे** :

(1) अ आणि ब (2) अ, ब, क (3) क आणि ब (4) यापैकी नाही

---

३. चिखली या गावी पहिली शाळा कधी सुरू झाली.

(1) ९ जुलै १९१७ (2) ३० सप्टेंबर १९१७ (3) ४ मार्च १९१८ (4) १५ एप्रिल १९२०

---

४. खालीलपैकी कोणते/ती विधान/ने ***चुकीचे*** आहे/त ?

अ. नाशिक येथील विद्यार्थी वसतिगृह इमारतीच्या पायाभरणी समारंभाचे प्रमुख पाहुणे – शाहू छत्रपती

ब. हंटर कमिशनपुढे साक्ष – महात्मा फुले

क. ॲनी बेझंट यांच्या मद्रास येथील थिऑसॉफिकल सोसायटीत काम – वासुदेव द. तोफखाने आणि गंगाधर दीक्षित

ड. माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणावर लक्ष केंद्रित करणारे नेते – विष्णूशास्त्री चिपळूणकर व गोपाळ कृष्णा गोखले

**पर्यायी उत्तरे** :

(१) फक्त अ (२) फक्त क (३) वरीलपैकी एकही नाही. (४) अ आणि ड

---

५. शाहू छत्रपतींनी राज्यकारभार हाती घेण्यापूर्वी कोल्हापुरात उच्च शिक्षण आणि माध्यमिक शिक्षणासाठी ..... कार्यरत होते.

अ. राजाराम हायस्कूल ब. विद्यापीठ हायस्कूल क. राजाराम कॉलेज

**पर्यायी उत्तरे** :

(1) वरील सर्व (2) अ आणि ब (3) अ आणि क (4) फक्त क

---

*** पुढील उतारा वाचून त्यावर आधारित ६ ते १० प्रश्नांची उत्तरे द्या :**

पेब्लो पिकासो विसाव्या शतकातला अतिशय प्रभावशाली चित्रकार होता. माझ्या मते शोध घेणे याला चित्रकाराच्या लेखी काही महत्त्व नाही. खरे महत्त्व आहे ते सापडण्याला. खाली मान घालून जमिनीकडे एकटक बघणाऱ्या व आयुष्यभर नशीबाच्या भरवशावर राहणाऱ्या माणसाच्या मागे जाण्यास कोणीही तयार होणार नाही. जो व्यक्ती स्वतः काहीतरी शोधतो, मग ते काहीही असो किंवा त्याच्यासाठी ते वांच्छीत असो किंवा नसो, अशी व्यक्ती आपल्या कुतूहलाचा विषय ठरते. माझ्यावरती जे अनेक पापकृत्ये करण्याचे आरोप लावले गेले आहेत त्यापैकी सर्वात खोटा आरोप म्हणजे हा की मी माझ्या कलाकृती साकारताना 'संशोधनाची वृत्ती' कलाकृतीचे प्रमुख उद्दिष्ट म्हणून उरात बाळगतो. जेव्हा मी चित्र रंगवितो तेव्हा माझा उद्देश्य 'मला काय सापडले आहे' हे दाखविणे असतो. 'मी काही शोधतो आहे' हे सांगणे नव्हे. कलेमध्ये 'हेतू' केवळ पुरेसा नाही. स्पॅनिशमध्ये अशी एक म्हण आहे की प्रेम सिद्ध करण्यासाठी वस्तुस्थिती जन्य गोष्टी महत्त्वाच्या आहेत, तर्क नव्हे. व्यक्ती कुठल्या हेतूने कार्य करते हे महत्त्वाचे नसून ती काय कार्य करते हे अधिकार महत्त्वाचे.

कला ही सत्य नव्हे हे सर्वज्ञात आहे. कला अशी असत्य बाब आहे जी आपणाला सत्याचे दर्शन घडविते, असे सत्य जे आपणाला भासविले जाते. आपल्या असत्यातील सत्य पटवून सांगण्याचे कौशल्य किंवा पद्धत कलाकाराला अवगत असली पाहिजे. जर कलाकाराने आपल्या कलाकृतीमध्ये असत्याला सत्य दाखविण्यासाठी केलेल्या पद्धतींच्या वापराविषयीचे संशोधन केवळ दाखविले, तर त्यास यश मिळणार नाही. संशोधनाच्या कल्पनेने चित्रकलेला नेहमीच भरकटविलेले आहे आणि चित्रकाराला गहन चिंतनामध्ये गुंगविले आहे. बहुतेक आधुनिक कलेमधले हे प्रमुख वैगुण्य असावे. संशोधन वृत्तीने त्या सर्वांची बुद्धी विषाक्त केली ज्यांना आधुनिक चित्रकला (मॉडर्न आर्ट) मधील चांगल्या व विश्वसनीय गोष्टी पूर्णपणे कळल्या नाहीत. म्हणून अदृश्य, रंगविण्यासारखे नसलेल्या गोष्टी सुद्धा चित्रित करण्यात प्रयत्न केला गेला.

आधुनिक चित्रकला निसर्गवादाच्या विरोधी आहे असे मानून चर्चा केली जाते. नैसर्गिक कलाकृती पाहिली आहे अशी कुणी व्यक्ती असेल का हे जाणून घेण्याची मला इच्छा आहे. निसर्ग व कला या दोन भिन्न गोष्टी आहेत.

---

६. आधुनिक कलेमधले प्रमुख वैगुण्य कोणते ?

अ. असत्यातील सत्य पटवून सांगण्याचे कौशल्य किंवा पद्धत
ब. संशोधनाची कल्पना चित्रकलेला नेहमीच भरकटविते.
क. संशोधनाची कल्पना चित्रकाराला गहन चिंतनामध्ये गुंगविते.
ड. रंगविण्यासारखे नसलेल्या गोष्टी सुद्धा चित्रित करण्याचा प्रयत्न

वरीलपैकी कोणते विधाने बरोबर आहेत ?

(1) अ, ब आणि क (2) ब आणि क
(3) क आणि ड (4) अ आणि ड

---

७. खालीलपैकी कोणती व्यक्ती आपल्या कुतूहलाचा विषय ठरते ?

अ. खाली मान घालून जमिनीकडे एकटक बघणाऱ्या व आयुष्यभर नशीबाच्या भरवशावर राहणारी व्यक्ती
ब. स्वतःहून काहीतरी शोधणरी, मग ते काहीही असो किंवा त्याच्यासाठी ते वांच्छीत असो किंवा नसो, अशी व्यक्ती
क. कलाकृतीचे प्रमुख उद्दिष्ट म्हणून 'संशोधनाची वृत्ती' उरात बाळगणारी व्यक्ती

वरीलपैकी कोणती तरतूद बरोबर नाही ?

**पर्यायी उत्तरे :**

(१) फक्त अ आणि ब (२) फक्त ब
(३) ब आणि क (४) अ आणि क

---

८. जेव्हा मी चित्र रंगवितो तेव्हा माझा उद्देश 'मला काय सापडले आहे' हे दाखविणे असतो, 'मी काय शोधतो आहे हे सांगणे नव्हे.' हे वाक्य ......

(१) उताऱ्याच्या मूळ मुद्याला सोडून आहे.

(२) लेखावरील आरोपांचे खंडन आहे.

(३) केलेल्या अनेक पापकृत्यांचे स्पष्टीकरण आहे.

(४) एक खोटे विधान आहे जे लेखक खोटे सिद्ध करू इच्छितो.

---

९. 'कला म्हणजे सत्य नव्हे' या विधानाचा अर्थ......

(१) कलाकार हे खोटारडे असतात आणि मूलतः विश्वासार्ह नसतात.

(२) आपण कलेला खूप गांभीर्याने घेऊ नये.

(३) कला आपणाला सत्यापेक्षाही जास्त महत्त्वाचे काही देते, कला आपणास 'जाण' (समज) देते.

(४) आपण हे मान्य करायला पाहिजे की सत्य हे अनेक रूपांमध्ये दिसते.

---

१०. पिकासोच्या मते आधुनिक कलेची समस्या ही आहे की ती ...... आहे.

(१) अस्पष्ट (२) संदिग्ध (३) अमूर्त (४) दुर्बोध

---

✻ **पुढील उतारावाचून त्यावर आधारित ११ ते १५ प्रश्नांची उत्तरे द्या :**

विज्ञानाचा उगम माणसाच्या जीवनसंघर्षातून झाला हे उघड आहे, तरी पण सत्य संशोधन आणि सुखद जीवन या दोन्ही प्रेरणा प्रथमपासून विज्ञानाच्या प्रगतीला कारणीभूत झाल्या. निसर्ग आणि भोवतालची परिस्थिती यांचे अधिकाधिक ज्ञान संशोधनाने मिळविण्याचा माणसाचा प्रयत्न हे त्याच्या प्राथमिक विज्ञानाचे स्वरूप होते. असे संशोधन करता येण्यासाठी लागणारी विशिष्ट बुद्धी, कुशलता, ज्यांच्याजवळ होती ते शास्त्रज्ञ म्हणून गणले गेले. विज्ञानामुळे समाज प्रगत होत गेला आणि प्रगत समाजात विज्ञानाची प्रगती होत गेली. म्हणूनच विज्ञानाच्या इतिहासाचे विहंगमावलोकन केले, तर साधारण तीन स्थूल अवस्थांतून त्यांची प्रगती झाल्याची दिसते. (१) पौर्वात्य संस्कृतीतील विज्ञान, (२) पाश्चिमात्य विज्ञान आणि (३) जागतिक विज्ञान. जेथे जेथे संस्कृतीचा विकास झाला तेथे तेथे विज्ञानाची प्रगती झाली. येथे कारण हे परिणाम आणि परिणाम हे कारण ठरते. विज्ञान पाश्चिमात्यांची निर्मिती आहे हा समज पौर्वात्यांच्या अज्ञानाचा आणि त्याहीपेक्षा न्यूनगंडाचा परिपाक आहे.

पूर्वेकडील अतिप्राचीन संस्कृतीत शास्त्रांची किती प्रगती झाली होती हे पुरेसे स्पष्ट नाही. १८५४ – ५५ साली झालेल्या उत्खननातून सुमेरियनांच्या बॅबिलोनियन संस्कृतीवर प्रथमच प्रकाशझोतात पडला. तेथे सापडलेल्या शिलालेखात उल्लेखिलेल्या वस्तूंमध्ये रथ, घड्याळ, कमानी, कायदासंग्रह इत्यादींचा समावेश आहे. सॅम्युअल क्रॅमर या पुरातत्त्वशास्त्रज्ञानच्या मते, सुमेरियन संस्कृतीतील निदान सत्तावीस 'ऐतिहासिकदृष्ट्या प्रथम' अशा गोष्टी उजेडात आल्या. सुमारे सहा हजारांपेक्षा अधिक वर्षापूर्वी बॅबिलोनिया (नंतर मेसापोटेमिया, आता इराक) मध्ये ५०,००० ते १,००,००० वस्तीची एरिडू (Eridu), उरुक (Uruk), उम्मा (Umma) इ. मोठाली वैभवशाली शहरे होती. अशी प्रगती आवश्यक त्या विज्ञानाशिवाय अशक्य होती. इजिप्तने तर आतापर्यंत काळावर मात करणाऱ्या पिरॅमिड्सचा चमत्कार घडविला. भारत आणि चीनमधील संस्कृतींनी त्याबाबत चार पावले पुढेच टाकली होती. कणाद ऋषींनी (इ. स. प्रारंभी) भारतीय अनुवादाची मांडणी केली. आर्यभट्ट यांनी इ. स. ५०० च्या सुमारास $\pi$ (पाय) चे मूल्य ३,१४१६ आणि सौरवर्षाचा काळ ३६५ – ५६ दिवस म्हणून ठरविले. पृथ्वी सूर्याभोवती फिरते, ती गोलाकार आहे या गोष्टी आर्यभट्ट यांना ज्ञात होत्या. चीनमधील पंडितजन विज्ञानक्षेत्रात फार प्राचीन काळापासून जागरूक होते. कागद व छपाई या चीनच्या जगाला अतिशय मोलाच्या देणग्या आहेत. अरबांनी खगोलशास्त्र व गणित यांमध्ये प्रावीण्य प्रकट केले. अल – ख्वारीझमी (Al-khvarigmi), (इ. स. ८५०) या अरब शास्त्रज्ञाने लिहिलेल्या अल् – जब्र (Al-Jabr)

ला 'अलजिब्रा' या गणितशास्त्रातील विभागाची पहिली संहिता मानण्यात येते. सारांश, आपापल्या काळाच्या मर्यादेत पौर्वात्य संस्कृती विज्ञान विषयात प्रगत होत्या. अर्थात, शेवटी ज्ञान विज्ञानाचे धन कोठल्या देशाचे वा खंडाचे असत नाही. ते असते मानवाचे, मानवासाठी.

---

११. बॅबिलोनियन संस्कृती पुढीलपैकी कोणत्या बाबतीत प्रगत होती असा पुरावा नाही ?
(१) वास्तुरचना (२) तत्त्वज्ञान (३) प्रशासन (४) कालमापन

---

१२. ज्ञान–विज्ञानाचे धन सर्व मानवजातीचे असते, असे म्हणण्याचे कारण :
(१) काही काळाने ते सर्व लोकांपर्यंत पोहोचते.
(२) संपर्कसाधने वाढल्यावर ते मर्यादित ठेवता येत नाही.
(३) त्यावर व्यक्तीला स्वामित्वहक्क सांगता येत नाही.
(४) शेवटी ते मानवी बुद्धीने मिळविलेले ज्ञान असते.

---

१३. मानवाची जिज्ञासाच विज्ञानाला चालना देणारी ठरली, त्याच्या जीवनात आलेली सुखावहता हा नंतरचा दुय्यम परिणाम होय.
(१) पूर्ण विधान चूक (२) पूर्ण विधान बरोबर
(३) पूर्वार्ध बरोबर (४) उत्तरार्ध बरोबर

---

१४. पाश्चिमात्यांनीच विज्ञान निर्माण केले, ही समजूत होण्यास लेखकाच्या मते पुढीलपैकी कोणते कारण नाही?
(१) पौर्वात्यांचा न्यूनगंड (२) पौर्वात्यांचे स्वतःच्या इतिहासाबद्दलचे अज्ञान
(३) अतिप्राचीन पुराव्यांचा अभाव (४) पाश्चिमात्यांकडील ऐतिहासिक पुरावे

---

१५. विज्ञानाचा विकास व संस्कृतीचा विकास या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत. तसेच परस्पर प्रेरकही आहेत.
(१) पूर्ण विधान चूक (२) पूर्ण विधान बरोबर
(३) पूर्वार्ध बरोबर (४) उत्तरार्ध बरोबर

---



Study CIRCLE

* **पुढील उतारावाचून त्यावर आधारित १६ ते २० प्रश्नांची उत्तरे द्या :**

वेलबुट्टीदार पडदे हे विणकराच्या मागावर तयार केले जातात. त्यांची भिन्नत्वदर्शक वीण ही मुळात साधी असते. ज्यामध्ये रंगीत धाग्यांची आडवी वीण ही यथाक्रम एकाच प्रकारच्या धाग्यांना जोडलेली असते, जसे की रफ्फमध्ये किंवा साध्या कापडावर असते, परंतु अशा प्रकारची वीण तयार होत असताना रंग बदलण्यासाठी धागे त्यांची दिशा बदलून एका प्रकारची नक्षी तयार करतात. आच्छादन झाकण्यासाठी वीण ही अतिशय बारीक पद्धतीने केली जाते. त्याची परिणती ही एखाद्या विशिष्ट रचनेत किंवा चित्रात होते की जे मुळात विणलेले कापड असते, ते पृष्ठभागावर काढलेले नक्षीकाम, ठसा किंवा जरीकाम नसते. वेलबुट्टीदार पडद्याची मागील व समोरील बाजू एकाच प्रकारची नक्षी दर्शवितात. विणकर हे बहुधा अस्तित्वात असलेल्या रचना वापरतात, जसे की एखादी चित्र किंवा रंगवलेले चित्र की जे व्यंगचित्र म्हणून ओळखले जाते. बऱ्याचदा अशा प्रकारचे व्यंगचित्र जसेच्या तसे उतरविण्याचा प्रयत्न विणकर करतो. व्यावसायिक वेलबुट्टीदार पडद्यांचा विणकर होण्यासाठी दीर्घकालीन अनुभवाची आवश्यकता असते. साधारणतः एक यार्ड लांबीचा पडदा व्यवस्थितपणे विणण्यासाठी एक वर्षाचा कालावधी लागतो.

विणकाम असलेले बुट्टीदार पडद्यांचे कापड हे चीनपासून ते पेरूपर्यंत व अगदी प्रारंभापासून तर आत्तापर्यंत तयार केले जाते. परंतु लोकरीच्या लांबलचक झालरींच्या भिंतींचे कौशल्ये ही सर्वसाधारणपणे उत्तर युरोपातील आहेत. चौदाव्या शतकाच्या पूर्वीची काही उदाहरणे अस्तित्वात आहेत, परंतु साधारणपणे १४०० सनापासून बुट्टीदार पडदे हे उच्चकुलीन वर्गाच्या जीवनाचा अत्यावश्यक भाग होते. राजकुमार किंवा सरदार हे आपल्या आगमना अगोदर तबक व बुट्टीदार पडदे हे किल्ला सुसज्ज करण्यासाठी पाठवीत असत. दोन्ही गोष्टींचा उद्देश एकच होता की आपल्या संपत्तीचे प्रदर्शन करणे व त्यातून आपली सामाजिक पत दाखविणे. बऱ्याचदा असे म्हटले जाते की, बुट्टीदार पडद्यांचा वापर हा दगडीकाम असलेल्या खोल्यांना ऊब देण्याचे काम करत, परंतु ही आधुनिक कल्पना होय. मध्ययुगीन काळात सुखसोयी या कमी महत्त्वाच्या मानल्या जात. बुट्टीदार पडदे हे सहजगत्या हालविण्याजोगे वैभव होते, जणुकाही जागा हालविण्यासारखे, गिलाव्यावरील उत्तरेकडील आल्प्स पर्वत रांगा दक्षिणेकडे नेण्यासारखे ते अशा पद्धतीने टांगले जात की त्यांच्यामध्ये थोडेदेखील अंतर नसे व ते सर्व भिंत व्यापून टाकत आणि बऱ्याचदा दारे देखील झाकली जात. अनेकदा पडदे हे खास पद्धतीने बनवून घेतले जात किंवा त्यांचा संच विकत घेण्यात येत असे किंवा एखाद्या 'दालनाच्या' सुसज्जतेसाठी पडदे हे अतिमहत्त्वाचे असत. केवळ तबक दर्शविण्याचा बाग सोडून, मध्ययुगीन व सोळाव्या शतकात त्यांचा वापर सरसकट केला जाई. नंतरच्या काळात रेशमी कपडे, लाकडावरील कलाकुसर, भिंतीवरील गिलावा आणि रंगवलेले कातडे अशा महागड्या गोष्टींनी बुट्टीदार पडद्यांची जागा घ्यावयास सुरुवात केली आणि त्यानंतर अठराव्या शतकाच्या शेवटी भित्ती कागदाचा प्रवेश झाला व त्यानंतर इतर सर्व गोष्टी बाजूला सारल्या गेल्या.

इंग्लंडमध्ये त्याच शतकाच्या उत्तरार्धात मॉरिस यांनी अस्तित्वात असलेला कल बदलवण्याचा प्रयत्न केला आणि बुट्टीदार पडद्यांना त्यांचे पूर्वीचे मध्ययुगीन कालीन वैभव मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याने मध्ययुगीनकाळातील बुट्टीदार पडद्यांची शैली आणि कौशल्य यांची नक्कल करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो तशा प्रकारचे संच बनवू शकला नाही. बुट्टीदार पडद्यांचा मूळ हेतू हा दालनांच्या भिंती रुबाबदारपणे आच्छादने हा होता, परंतु त्या उद्देशाचे पुनर्जीवन होऊ शकले नाही. मॉरिसचा प्रयोग अनेकांनी अवलंबण्याचा प्रयत्न केला, अर्थात कमीत कमी मध्यमकालीन शैलीची नक्कल करून चालू शतकात अनेक विणकरांचे विणलेले भरभरीत कपडे हे केवळ एखाद्या चित्राप्रमाणे उभे राहिले आणि ज्यांचे कौतुक केवळ समकालीन कलेचे उदाहरण म्हणून केले जाईल.

---

१६. मध्ययुगीनकाळातील बुट्टीदार पडद्यांची शैली आणि कौशल्य यांची नक्कल करण्याचा प्रयत्न मॉरिस यांने केला, परंतु तो तशा प्रकारचे संच बनवू शकला नाही, कारण ...

(1) मध्यमकालीन शैलीची नक्कल करून चालू शतकात कालबाह्य ठरली.

(2) अठराव्या शतकाच्या शेवटी भित्ती कागदाने इतर सर्व गोष्टी बाजूला सारल्या.

(3) बुट्टीदार पडद्यांचा जो मूळ हेतू, दालनांच्या भिंती रुबाबदारपणे आच्छादने हा होता,त्याचे पुनरुज्जीवन झाले नाही.

(4) व्यावसायिक वेलबुट्टीदार पडद्यांचा विणकर होण्यासाठी दीर्घकालीन अनुभवाची आवश्यकता होती.

---

१७. भिंती सजविण्यासाठी वापरल्या गेलेल्या विविध पद्धतींचा योग्य क्रम लावा –

अ. रेशमी कपडे, लाकडावरील कलाकुसर, भिंत्तीवरील गिलावा आणि रंगवलेले कातड

ब. वेलबुट्टीदार पडदे

क. भित्ती कागद

वरीलपैकी कोणती तरतूद बरोबर नाही ?

**पर्यायी उत्तरे :**

(१) अ – ब – क (२) ब – क – अ (३) ब – अ– क (४) अ – क – ब

---

१८. वेलबुट्टीदार कापड विणण्यामागील प्रमुख कारण.....

(१) विणकराच्या कौशल्याचे प्रदर्शन करणे.

(२) दगडी भिंतीच्या खोली उबदार करणे.

(३) भपकेबाज व आलिशान जीवनाचे प्रदर्शन करण्यासाठी खर्चीक वातावरण तयार करणे.

(४) अमीर/सरदारांच्या संपत्तीचे व उच्च सामाजिक स्तराचे प्रदर्शन करणे.

---

१९. एकोणिसाव्या शतकातील वेलबुट्टीदार कापडाच्या तुलनेत समकालीन कापड ......

(१) फलकांच्या संचामध्ये प्रदर्शित केले जाते.

(२) मध्ययुगीन विषय भासवतात.

(३) कमी बारीक विणकामाचे असते.

(४) हुबेहूब तैलचित्राची नक्कल करते.

---

२०. उताऱ्याचा प्राथमिक उद्देश –

(१) वेलबुट्टीदार कापड विणण्याची प्रक्रिया स्पष्ट करून सांगणे आहे.

(२) वेलबुट्टीदार कापडाच्या घसरत्या लोकप्रियतेचे परीक्षण करणे.

(३) वेलबुट्टीदार कापड बनविण्याचा ऐतिहासिक दृष्टीकोन समोर ठेवणे.

(४) वेलबुट्टीदार कापडाच्या प्राचीन व आधुनिक पद्धतींचा फरक दाखविणे.

---



Study CIRCLE

※ **पुढील उतारावाचून त्यावर आधारित २१ ते २५ प्रश्नांची उत्तरे द्या :**

'नाटो'ची स्थापना एप्रिल १९४९ मध्ये याचे मूळ सदस्य देश बेल्जियम, कॅनडा, डेन्मार्क, फ्रान्स, आयर्लंड, इटली, लक्झेंम्बर्ग, नेदरलँड्स, नॉर्वे, पोर्तुगाल, इंग्लंड आणि अमेरिका यांनी सोव्हिएत युनियनकडून त्यांच्या सुरक्षेला धोका असल्याची भीती व्यक्त केल्यामुळे झाली. कलम ५ मध्ये नमूद केलेली याची मध्यवर्ती कल्पना अशी आहे. सर्व सदस्य देश याबाबत सहमत असतील की युरोप आणि उत्तर अमेरिकेतील त्यांच्यापैकी एक किंवा त्याहून जास्त देशांवर शस्त्रास्त्र हल्ला झाला, तर तो त्या सर्वांवरच आक्रमण झाल्यासारखा असेल.

नाटो ही एक मोठी संघटना आहे. परंतु ही मोठी संघटना अगोदरच्या संघटनांपेक्षा थोडी वेगळी आहे. अगोदरच्या ज्या मोठ्या संघटना स्थापन झाल्या की ज्यांनी नेपोलियन, कैसर विल्हेल्म आणि अॅडॉल्फ हिटलर सारख्यांचा पराभव केला. परंतु त्या संघटना आक्रमण होऊन गेल्यानंतर स्थापन झाल्या होत्या. प्रतिकार आणि सुरक्षा हे नाटोचे दोन प्राथमिक उद्देश आहेत. शांतता काळात स्थापन झालेली ही संघटना सोव्हिएत युनियनच्या आक्रमणाला प्रतिकार करेल असा विश्वास होता. भलेही प्रतिकार अयशस्वी झाला तरी या संघटनेच्या सदस्य देश राजकीयदृष्ट्या एकत्र येतील आणि लष्करीदृष्ट्या भक्कम बनतील की ज्यामुळे सोव्हिएतचा विजय ते हाणून पाडतील.

नाटोच्या स्थापनेमध्ये काही घटक महत्त्वाचे मानले गेले. त्यामध्ये अमेरिकेची आण्विक ताकद, सोव्हिएतच्या धोरणांची भीती आणि युरोपियन लोकांची आर्थिक स्थिती हे होत. सुरुवातीला एप्रिल १९४९ मध्ये अमेरिकेचा आण्विक शस्त्रास्त्रांमुळे वरचष्मा होता. त्यांच्या पश्चिम युरोप आणि आफ्रिकेमध्ये असलेल्या काही हवाई अड्यांच्या सोईमुळे अमेरिकेची ही शस्त्रास्त्रे सोव्हिएत युनियनमध्ये घेऊन जाण्याची क्षमता होती. अमेरिकेच्या आण्विक ताकदीमुळे सोव्हिएतला चांगला प्रतिकार झाल्याचा नाटोच्या सदस्य देशांना विश्वास होता.

दुसरे म्हणजे या सदस्य देशांना असेही वाटत होते की विशेषतः सोव्हिएत युनियन आणि कम्युनिझममुळे पाश्चात्त्य सुरक्षेला धोका पोचत होता. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतरचा काळ हा ग्रीसमधील नागरी युद्ध, फ्रान्स आणि इटलीमध्ये कम्युनिस्टने घेतलेली सत्ता, सोव्हिएतच्या प्रेरणेने कम्युनिस्टने १९४८ मध्ये घेतलेली सत्ता आणि १९४८ मध्ये बर्लिनचे अडविलेले रस्ते अशा प्रकारच्या धोक्यांचा काळ होता.

तिसरी गोष्ट म्हणजे पश्चिम युरोप दुसऱ्या जागतिक महायुद्धामुळे उद्ध्वस्त झाला होता आणि आर्थिक आधारासाठी अमेरिकेवर अवलंबून होता. १९४७ च्या मार्शल योजनेनुसार अमेरिकेने आपल्या पश्चिम युरोपियन सहकारी देशांना १५०० कोटी डॉलरची मदत केली होती. यावरून त्यांच्यातील आर्थिक संबंध दिसून येतात.

'नाटो' अस्तित्वात आल्याच्या ३५ वर्षानंतर या संघटनेच्या तरतुदी आणि मूळ ढाचा यामध्ये बराच बदल झाल्याचे दिसून येते. १९६० पर्यंत अमेरिकेचे आण्विक शस्त्रास्त्रांमध्ये जे वर्चस्व होते ते आता राहिलेले नाही. १९६२ मधील क्युबाच्या क्षेपणास्त्र संकटाच्यावेळी सोव्हिएत युनियनकडे लांब पल्ल्याची ७० क्षेपणास्त्रे होती की ज्यांना इंधन भरण्यासाठी १० तासांची आवश्यकता पडली. त्यामुळे सोव्हिएतची ही क्षेपणास्त्रे सोडण्याअगोदरच अमेरिकी आक्रमणाला बळी पडली.

यान किप्पुरच्या १९७३ च्या युद्धापर्यंत अमेरिकेचे अण्वस्त्र शक्तीमध्ये प्रचंड वर्चस्व होते आणि त्यांची आण्विक ताकद ८:१ अशा वरचढ प्रमाणात होती. नॅटोची सदस्य संख्या वाढली. ग्रीस आणि तुर्की १९५२ मध्ये या संघटनेशी जोडले गेले, तर १९५५ मध्ये पश्चिम जर्मनीने प्रवेश केला. पश्चिम जर्मनीचा १९५५ मधील 'नाटो'तील प्रवेश हा त्याचवर्षी वॉर्सा करारानुसार स्थापन केली गेलेली समकक्ष सोव्हिएत सुरक्षा संघटना हे तत्काळ कारण होते. १९८२ मध्ये स्पेन हा 'नाटो'चा सोळावा सदस्य देश बनला.

---

२१. उताऱ्यात उल्लेख झालेल्या ऐतिहासिक घटनांचा योग्य क्रम लावा.

अ. यान किप्पुरचे युद्ध ब. ग्रीसमधील नागरी युद्ध

क. सोव्हिएत सुरक्षा संघटनेची स्थापना ड. मार्शल योजना

**पर्यायी उत्तरे :**

(1) ड, अ, ब, क (2) अ, ड, क, ब (3) ड, ब, अ, क (4) अ, ड, क, ब

---

२२. नाटोच्या स्थापनेमध्ये कोणते घटक महत्त्वाचे मानले गेले ?

अ. सोव्हिएतच्या धोरणांची भीती

ब. युरोपियन लोकांची आर्थिक स्थिती

क. अमेरिकेची आण्विक ताकद

वरीलपैकी कोणती तरतूद बरोबर नाही ?

**पर्यायी उत्तरे** :

(१) फक्त अ आणि ब (२) फक्त ब

(३) अ, ब आणि क (४) अ आणि क

---

२३. 'नाटो'च्या संदर्भात 'प्रतिरोध' हा शब्द काय सुचवितो?

(१) इतर देशांना आक्रमणासाठी आणि खास करून सोव्हिएत युनियनला परावृत्त करण्यासाठी

(२) अगोदरच्या संघटनांपेक्षा 'नाटो'चा आकार मोठा असणे.

(३) उर्वरित युरोपपेक्षा नॅटोची सदस्यसंख्या जास्त असणे.

(४) सोव्हिएत युनियनची संभाव्य आक्रमक भूमिका

---

२४. नाटोचे संघटन खालीलपैकी कुठल्या कारणाव्यतिरिक्त झाले होते.

(१) फ्रान्समधील लोकशाहीचा उदय

(२) अमेरिकेची लष्करी ताकद

(३) युरोपची आर्थिक गरज

(४) कम्युनिझमच्या प्रसाराविषयी भय

---

२५. खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे?

(१) ही संघटना आर्थिकदृष्ट्या अमेरिकेला फायदेशीर ठरेल.

(२) क्युबा क्षेपणास्त्र संकट अमेरिकेच्या आक्रमणापुढे सोव्हिएतचे क्षेपणास्त्र भक्ष्य झाल्याशी संबंधित आहे.

(३) दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएत युनियनच्या कम्युनिझममुळे पाश्चिमात्य सुरक्षेला संभाव्य धोका होता.

(४) नाटो ही एक मोठी संघटना आक्रमण होऊन गेल्यानंतर प्रतिकार आणि सुरक्षेच्या उद्देशाने स्थापन केली गेली.

---



Study CIRCLE

※ **पुढील उतारावाचून त्यावर आधारित २६ ते ३० प्रश्नांची उत्तरे द्या :**

जीवनाचा विकास एकानंतर एक आव्हानांना सामोरे जाण्यावर अवलंबून असतो. एकदा एक माणूस स्वत:चे नाव लिहीत बसलेल्या आपल्या लहान भाच्याकडे पहात होता. त्याच्यासाठी नाव लिहिणे फार अवघड होते. त्या लहान मुलाने प्रयत्नांची पराकाष्ठा गाठली होती. आज तो त्याचे नाव तुलनेने सहज लिहू शकतो. त्यात त्याला कोणतेही नवीन आव्हान आढळत नाही. आपल्या सर्वांबाबतही असेच आहे. आपण एका आव्हानाला सामोरे गेलो, एका अडचणीवर विजय मिळविला की एक नवीन अडचण समोर येते किंवा आली पाहिजे. काही लोक आव्हाने टाळण्याची चूक करतात. ज्या कशाला स्वच्छ विचार आणि ऊर्जेचा वापर करावा लागतो, ते टाळण्याचा प्रयत्न करतात, ते आहे त्या परिस्थितीत राहणे पसंत करतात, जेथे त्यांना नवीन उंबरठे ओलांडावे लागत नाहीत. कदाचित ते त्यांच्या व्यवसायात काही वर्षापासून असतील त्यामुळे ते त्यांच्यासाठी सोपे असेल. ते नवीन उंबरठे शोधून त्यांच्यावर मात करण्याचा प्रयत्न करत नाहीत, अशा परिस्थितीत खरा विकास थांबतो.

काही मध्यमवयीन आणि वयस्कर लोक सतत आव्हाने स्वीकारून त्यांचे आयुष्य समृद्ध करतात. डी मॉर्गन यांनी वयाच्या साठीनंतर कादंबरी लिहिण्यास सुरुवात केली. मानसशास्त्रज्ञांनी असा शोध लावला आहे की मनुष्य आयुष्यभर शिकत राहू शकतो आणि नि:संदेह प्रयत्न करुन अयशस्वी होणे हे अजिबात प्रयत्न न करण्यापेक्षा केव्हाही चांगलेच. या संदर्भात आपणास एका स्वीस गिर्यारोहकाचे उदाहरण देता येईल ज्याबाबत असे म्हटले गेले. ''तो चढता चढता मृत पावला'' जेव्हा एखादा नवीन अडथळा तुमच्या वाटेत निर्माण होतो तेव्हा तक्रार करू नका. ते आव्हान स्वीकारा. तो अडथळा पार करण्याचा मनाचा ठाम निर्धार करा. कारण गत जीवनामध्ये तुम्ही असे असंख्य उंबरठे पार केले आहेत हे लक्षात असू द्या.

---

२६. कोणत्या परिस्थितीत खरा विकास थांबतो ?

अ. व्यवसायात काही वर्षापासून असल्याने निर्माण झालेला गतिरोध

ब. आव्हाने टाळण्याची चूक केल्यास

क. आहे त्या परिस्थितीत राहणे पसंत केल्याने

ड. सतत आव्हाने स्वीकारून आयुष्य समृद्ध करण्याची ऊर्मी नसल्याने

वरीलपैकी कोणते विधाने बरोबर आहेत ?

(1) अ, ब आणि क (2) ब आणि क

(3) क आणि ड (4) अ आणि ड

---

२७. मानसशास्त्रज्ञांनी लावलेला शोध कोणता ?

अ. नि:संदेह प्रयत्न करुन अयशस्वी होणे हे अजिबात प्रयत्न न करण्यापेक्षा केव्हाही चांगले

ब. जीवनाचा विकास एकानंतर एक आव्हानांना सामोरे जाण्यावर अवलंबून असतो.

क. मनुष्य आयुष्यभर शिकत राहू शकतो

वरीलपैकी कोणती तरतूद बरोबर नाही ?

**पर्यायी उत्तरे :**

(१) फक्त अ आणि ब (२) फक्त ब

(३) ब आणि क (४) अ आणि क

---

२८. 'तो चढताना मेला' हे काय व्यक्त करते ?

(१) जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्याने पराकाष्ठा केली.

(२) तो टेकडी चढला आणि नंतर मेला.

(३) शिखरावर पोहोचण्यापूर्वी तो मेला.

(४) तो टेकडी चढत असताना मेला.

---

२९. जीवनात विकास कशावर अवलंबून असतो ?

(१) चांगल्या सवयी (२) कठोर परिश्रम

(३) एकानंतर एक संकटांवर मात करणे (४) सेवा आणि सहकारांची भावना

---

३०. डी मॉर्गनने केव्हा कादंबरी लेखनास सुरुवात केली?

(१) तो विद्यार्थी असल्यापासून (२) तो जेव्हा साठ वर्षाचा झाला तेव्हा

(३) तो जेव्हा साठ वर्षापेक्षा कमी होता. (४) तो जेव्हा साठ वर्षापेक्षा मोठा होता.

---

* **पुढील उतारावाचून त्यावर आधारित ३१ ते ३५ प्रश्नांची उत्तरे द्या :**

सागराचे पाणी हे जगण्याच्या प्रक्रियेत अपरिहार्य भूमिका बजावत असते. जलावरण हे सेंद्रिय अस्तित्वासाठी महत्त्वाचे असते. जलावरणाची वेगळीच वैशिष्ट्ये असतात कारण पाण्याचे गुणधर्म हे इतर द्रव पदार्थापेक्षा वेगळेच असतात. त्यातील एक विरोधाभास म्हणजे पाण्याला गोठविल्यास त्याचे आकारमान सुमारे ९ टक्क्यांनी विस्तार पावते. परंतु इतर द्रवपदार्थ गोठविल्यास आकुंचन पावतात. याच कारणामुळे बर्फ हे तळाशी न जाता पृष्ठभागावर तरंगते. जर बर्फ जलाशयाच्या तळाशी गेले तर जलावरण हे घनरूप अवस्थेत रूपांतरित होईल. फक्त उन्हाळ्यात पृष्ठभागावरील बर्फाचा पातळ थर वितळेल अशा प्रकारे जलचरांचे जीवन नाश पावेल आणि समशीतोष्ण हवामानासहित थंड व उष्ण प्रवाहांची अदलाबदल हे जाणवण्याइतपत संपुष्टात येईल.

आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे पाण्याची उष्मा धारकता होय जी केवळ अमोनियाचा अपवाद वगळल्यास, इतर सर्व घन व द्रव पदार्थापेक्षा सर्वात जास्त आहे. या वैशिष्ट्यामुळेच महासागर हे मोठ्या प्रमाणावरील उष्णता शोधून आणि साठवून ठेवू शकतात ज्यामुळे हवामानातले टोकाचे बदल टाळले जातात.

या बरोबरीने इतर कुठल्याही द्रवपदार्थांपेक्षा पाण्यात जास्त पदार्थ विरघळतात. हेच ते वैशिष्ट्य आहे जे महासागरांना खनिजांचे मोठे भांडार बनविते. ही खनिजे भूप्रदेशाच्या भागातून वाहत महासागरात येतात. जगातल्या बऱ्याच भागात या खनिजांचा व्यावसायिक दृष्टीने वापर होतो.

सौरशक्तीने बाष्पीभवन करुन मीठ तयार करतात. मृत समुद्रातून पोटॅश वेगळे काढले जाते. अमेरिकेच्या खाडी किनारा प्रदेशात सागराच्या पाण्यापासून मॅग्नेशिअम वेगळे काढले जाते.

---

३१. अमोनियाचा अपवाद वगळल्यास, इतर सर्व घन व द्रव पदार्थापेक्षा पाण्याची उष्माधारकता सर्वात जास्त असल्याने कोणत्या नैसर्गिक घटनांचे स्पष्टीकरण देता येते ?

अ. अमेरिकेच्या खाडी किनारा प्रदेशात सागराच्या पाण्यापासून मॅग्नेशिअम वेगळे काढले जाते.

ब. मृत समुद्रातून पोटॅश वेगळे काढले जाते.

क. महासागरांनी मोठ्या प्रमाणावर उष्णता शोषल्यामुळे हवामानातले टोकाचे बदल टाळले जातात.

ड. महासागर खनिजांचे मोठे भांडार आहेत.

वरीलपैकी कोणते विधाने बरोबर आहेत ?

(1) अ, ब आणि क (2) ब आणि क (3) क आणि ड (4) यापैकी नाही

---

३२. जर बर्फ जलाशयाच्या तळाशी गेले तर ..

अ. थंड व उष्ण प्रवाहांची अदलाबदल संपुष्टात येईल.

ब. फक्त उन्हाळ्यात पृष्ठभागावरील बर्फाचा पातळ थर वितळेल.

क. जलावरण हे घनरूप अवस्थेत रूपांतरित होईल.

वरीलपैकी कोणती तरतूद बरोबर नाही ?

**पर्यायी उत्तरे** :

(१) फक्त अ आणि ब (२) फक्त ब (३) अ, ब आणि क (४) अ आणि क

---

३३. खालीलपैकी पाण्याची कोणती वैशिष्ट्ये लेखकाने उताऱ्यात नमूद केली आहेत ?

अ. पाणी गोठल्यावर प्रसरण पावते.

ब. पाणी हे चांगले द्रावक आहे.

क. पाणी उष्णता शोषून घेऊ शकते.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) ब आणि क (४) वरील सर्व

---

३४. उताऱ्याचा मुख्य उद्देश ....... आहे.

(१) पाण्याचे गुणधर्म आणि उपयोग विशद करणे.

(२) पाण्याच्या संवर्धनाचे महत्त्व स्पष्ट करणे.

(३) पृथ्वीच्या समुद्राच्या वस्तुमानाची व्याप्ती प्रकट करणे.

(४) पाण्याची इतर द्रवांबरोबर तुलना करणे.

---

३५. उताऱ्यानुसार, मासे समुद्रात जिवंत राहू शकतात, कारण–

(१) त्यांना ऑक्सिजनची गरज नसते.

(२) बर्फ तरंगते.

(३) समुद्रात प्रवाह असतात.

(४) पाणी उष्णता शोषून घेत.

---



Study CIRCLE

*** पुढील उतारावाचून त्यावर आधारित ३६ ते ४० प्रश्नांची उत्तरे द्या :**

गेल्या शतकात इंग्रजी राज्यातील सुधारणेच्या प्रयत्नाने धार्मिक व सामाजिक विचारांची व आचारांची दिशा बदलली. परंतु ही सुधारणेची प्रवृत्ती अत्यंत उथळ आहे. हिंदी समाजाच्या खोल अंतरंगाचा ठाव या प्रवृत्तीने घेतलेला दिसत नाही. अबोल सनातन रूढीइतकी वज्रमय आहे की, ती एका क्षणात दीडशे वर्षांचा सामाजिक व धार्मिक सुधारणेचा इतिहास पुसून टाकू शकेल, पांढरपेशे लोक वरून सुधारलेले दिसतात.परंतु त्यांच्या गृहसंस्थेत शिरल्याबरोबर त्यांच्यातील पुरातन रूढीची जीर्ण अवकळा निदर्शनास येऊन भय निर्माण होते. ही गोष्ट ब्राह्मणेतर नव्या सुशिक्षित वर्गांनाही लागू आहे ते प्रच्छन्नपणे राजकारणातही जातिभेदाचे वारे पसरवीत आहेत. त्या त्या प्रदेश राज्यातील ग्रामीण भागात वर्चस्व गाजवणाऱ्या ब्राह्मणेतर जमाती मागासलेल्या व मरगळलेल्या लहान – लहान अल्पसंख्य जमातींना मागे रेटून चूप बसवीत आहेत. अस्पृश्यांना डोक वर काढू देत नाहीत; अस्पृश्यांना अडचणी वाढवून त्यांची लांडगेतोडही करण्यास प्रसंगी कचरत नाहीत. प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी हा गृहसंस्थेतील सनातन रूढीचा कलिपुरुष आपल्या अस्तित्वाच्या खुणा पटवितो. राजकीय निवडणुकीच्या वेळी सर्व जातपात व धर्मपंथ आपला हिडिस अहंकार प्रकट करतात. हिंदी समाजाला वा हिंदू समाजाला भविष्यकाळावर विजय मिळवून देणाऱ्या शुभ, उदार व मानव्यपूर्ण भावनांची विशाल संपदा अजून लाभली नाही. इंग्रजी राज्य व त्यातील सुधारकांची परंपरा यांनी फार थोडे दिले आहे. विशाल व सामर्थ्यशाली वैचारिक क्रांती घडविणारे नेतृत्व अजून निर्माण व्हावयाचे आहे.

---

३६. उताऱ्यास कोणते शीर्षक अधिक समर्पक वाटते ?

(१) हिंदी समाजसुधारणांचे भविष्य
(२) हिंदी समाजातील रूढींचे वर्चस्व
(३) हिंदी समाजसुधारणांची पृष्ठस्तरीयता
(४) हिंदी समाजातील जातीपातींचे राजकारण

---

३७. रूढीला वज्रमय का म्हटले आहे ?

(१) ती जीर्ण आहे.
(२) ती सनातन आहे
(३) ती अबोल आहे.
(४) ती जवळपास अपरिवर्तनीय आहे.

---

३८. इंग्रजी राज्यातील सुधारणेची प्रवृत्ती अत्यंत उथळ आहे, याचे कारण ..........

(१) तिने हिंदी समाजाला सखोल शोध घेतलेला नाही.
(२) ती एका गटापुरती आहे.
(३) ती सर्व समाजाला पसरलेले नाही.
(४) ती तात्पुरती आहे.

---

३९. सुधारणांचा इतिहास पुसला जाण्याची शक्यता का आहे?

(१) गृहसंस्थेतील रूढींची अवकळा
(२) राजकारणातील जातिभेदाचे वारे
(३) निवडणुकांमधील जातिधर्माचा अहंकार
(४) या सर्व कारणांचे एकत्र असणे

---

४०. हिंदी समाजाला उदार व मानव्यपूर्ण भावनांची संपदा अजून का लाभली नाही ?

(१) हिडिस राजकारण करणे
(२) एकूणच सुधारणावाद वरवरचा असणे.
(३) ब्राह्मणेतर जमातींचे वाईट वागणे
(४) गृहसंस्थेत रूढी कायम असणे.

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

※ **पुढील उतारावाचून त्यावर आधारित ४१ ते ४५ प्रश्नांची उत्तरे द्या :**

स्त्री–शक्तीची जाणीव फ्रेंच राज्यक्रांतीनंतरच्या नव्या विचारांच्या स्वीकाराबरोबरच व्हावयास हवी होती. स्त्री ही माणूस आहे आणि निसर्गाने दिलेले वेगळेपण सोडल्यास पुरुषांपेक्षा तिला भिन्न वागणूक मिळावयास नको होती. समतेच्या तत्त्वानुसार पुरुषांच्या बरोबरीनेच गेल्या तीनशे वर्षांची वाटचाल करण्याची संधी तिला मिळावयास हवी होती. परंतु झाले विपरीतच सामाजिक, धार्मिक, जातीय आणि कौटुंबिक पातळीवर अशास्त्रीय आणि परंपरांवर आधारून अनेक रुढीवजा अमानुष बंधनांमध्ये तिला जन्माला आल्यापासून मृत्यूपर्यंत जखडून ठेवले गेले. बाह्यत: संचारबंदी लादून आणि अंतर्गत: ज्ञानाची आणि आविष्काराची भूक मारावयास लावून तिला एक बंदिस्त, दुर्बल, अबोल आणि संकुचित दृष्टी असलेले असे व्यक्तिमत्त्व प्राप्त करू दिले. असे करण्यामध्ये समाजातील धर्ममार्तंड, कायदेपंडित, राजनीतिज्ञ, उद्योजक आणि घराघरांमधील कर्तेसवरते पुरुष नातेवाईक आणि नात्याचा अधिकार प्राप्त झालेल्या स्त्रियाही....... या साऱ्यांचा हात होता, अजूनही आहे. यांनी पाठिंबा दिलेल्या समाजव्यवस्थेमध्ये 'पुरुष' श्रेष्ठ आणि 'स्त्री' कनिष्ठ ठरली आणि संख्येने अर्ध्या असलेल्या मनुष्यबळाचा विकास खुंटविला गेला. 'स्त्री–वाद' चा विचार या परिस्थितीमुळेच एकोणिसाव्या शतकापासून पुढे आला आणि विसाव्या शतकाच्या अखेरीस तो स्वीकारण्याचे धैर्य सुजाण स्त्री पुरुषांमध्ये आले ! भारताचा नकाशा समजावून घ्यायचा असेल तर स्त्रियांनी स्त्रियांच्याच नव्हे तर मानवाशी संबंधित सर्वच प्रश्नांवर अन्यायाविरुद्ध दिलेल्या लढ्यांच्या प्रयत्नांच्या दाखल्यावरून घेता येतो. स्त्रीशक्ती संघटित झाली तर कायद्यांमधील जाचक कलमे रद्द करू शकते, न्याय व हक्क मागू शकते, स्वातंत्र्याची असो की समतेची अशा लढ्यामध्ये त्यागाचे आणि बलिदानाचे उच्चतम प्रदर्शन घडवू शकते. स्त्रीशक्तीची जाणीव आता स्त्रियांना होऊ लागली आहे ही आशादायी स्थिती आहे.

---

४१. स्त्रीला बंदिस्त, दुर्बल, अबोल आणि संकुचित दृष्टी असलेले असे व्यक्तिमत्त्व प्राप्त करून देण्यामध्ये कोणाचा हात होता ?

अ. सामाजिक, धार्मिक, जातीय आणि कौटुंबिक पातळीवर अशास्त्रीय परंपरांवर आधारित अनेक रुढीवजा अमानुष बंधने

ब. समाजातील धर्ममार्तंड, राजनीतिज्ञ आणि घराघरांमधील कर्तेसवरते पुरुष नातेवाईक

क. बाह्य संचारबंदी लादून अंतर्गत: ज्ञानाची आणि आविष्काराची भूक मारावयास लावण्याची प्रक्रिया

ड. समाजातील कायदेपंडित, उद्योजक आणि नात्याचा अधिकार प्राप्त झालेल्या स्त्रिया

वरीलपैकी कोणते विधाने बरोबर आहेत ?

(1) अ, ब आणि क (2) ब आणि क (3) क आणि ड (4) ब आणि ड

---

४२. श्रेष्ठ – कनिष्ठत्वामुळे काय झाले ?

(१) धर्ममार्तंडाचे महत्त्व वाढले. (२) उद्योजक क्षेत्रात प्रगती झाली.
(३) समाज अशिक्षित राहिला (४) देशाचा विकास खुंटला

---

४३. स्त्रीच्या अबोल व दुर्बलतेचे कारण काय ?

(१) अज्ञान (२) असाक्षरता (३) संकुचित दृष्टी (४) मर्यादा

---

४४. स्त्रीशक्ती संघटित झाली तर –

(१) कायदेपंडितांना आनंद होईल (२) समाजाचा विकास होईल
(३) परंपरेचे महत्त्व कळेल. (४) पुरुषांचे महत्त्व वाढेल.

---

४५. स्त्रियांना कशामुळे भिन्न वागणूक मिळाली ?

(१) कौटुंबिक विषमतेमुळे
(२) जातीय व्यवस्थेमुळे
(३) पारंपरिक बंधनांमुळे
(४) स्त्री असल्यामुळे

---

✻ **पुढील उताऱावाचून त्यावर आधारित ४६ ते ४८ प्रश्नांची उत्तरे द्या :**

**Passage I**

The greatest enemy of mankind, as people have discovered is not science, but war. Science merely reflects the social forces by which it is surrounded. It is found that when there is peace, science is constructive, when there is war, science is perverted to destructive ends. The weapons which science gives us, do not necessarily create war, these make war more terrible. Until now, it has brought us to the doorstep of doom. Our main problem is therefore, not to curb science, but to stop war – to substitute law for force, and intentional government for anarchy in the relations of one nation with another. That is a job in which everybody must participate, incuding scientists. But the bomb of Hiroshima suddenly woke us to the fact that we have very little time. The hour is late and our work has scarely begun. Now we are face to face with this urgent question : "Can education and toterance, understanding and creative intelligence run fast enough to keep us abreast of our own mounting capacity to destroy?" That is the question which we shall have to answer one way or the other in this generation. Science must help us in the answer, but the main decision lies within ourselves.

---

46. According to the author, the real enemy of mankind is not science but war because......

(1) science during wars is very destructive.
(2) science merely invents the weapons with which war is fought.
(3) the weapons that science invents neces sarily lead to war.
(4) the weapons invented by science do not cause war, though these make it more destructive.

---

47. An appropriate title for the passage would be ......

(1) Science and the new generation.
(2) Science and the social forces.
(3) Science and the horrors of war.
(4) Science and world peace.

---

48. According to the writer, the main problem we are faced with, is to ......

(1) prevent scientists from participating in destructive activities.
(2) abolish war.
(3) stop scientific progress everywhere.
(4) stop science from reflecting social forces.

---

※ **पुढील उतारावाचून त्यावर आधारित ४९ ते ५० प्रश्नांची उत्तरे द्या :**

Atheletes and actors – let actors stand for the set of performing artists – share much. They share the need to make gesture as fluid and economical as possible to make out of a welter of choices the single, precisely right one. They share the need for thousands of hours of practice in order to train the body to become the perfect, instinctive instrument to express. Both athlete and actor, out of that abundance of emotion, choice, strategy, knowledge of the terrain, mood of spectators, condition of others in the ensemble, secret awareness of injury or weakness, and as nearly an absolute concentration as possible so that all externalities are integrated, all distraction absorbed to the self, must be able to change the self so successfully that it changes us.

When either athletes or actor can bring all these skills to bear and focus them, then he or she will achieve that state of complete intensity and complete relaxation – complete coherence or integrity between what the performer wants to do and what the performer has to do. Then, the performer is free; for then, all that has been learned, by thousand of hours of practice and discipline and by repression of pattern becomes natural. Then intellect is upgraded to the level of an instinct.

---

49. Which best describes what the author is doing in the parenthetical comment "let actors stand for the set of performing artists"
(1) Indicating that actors should rise out of respect for the arts.
(2) Defining the way in which he is using a particular term.
(3) Emphasizing that actors are superior to other performing artists.
(4) Correcting a misinterpretation of the role of actors.

---

50. The phrase "bring all these skills to bear" in the beginning of second para, is best taken to mean that the athlete .....
(1) comes to endure these skills. (2) carries the burden of his talent.
(3) applies these skills purposefully (4) causes himself to behave skillfully.

---

५१. दोन विधाने व त्यानंतर चार अनुमाने दिली आहेत दोन्ही विधानांवरून मिळणारे अनुमान निवडा.
विधाने :
अ. सर्व कळफलक टंकलेखनाची साधने आहेत.
ब. सर्व टंकलेखनाची साधने कर्णकुंडले आहेत.
अनुमान :
(१) सर्व कर्णकुंडले कळफलक आहेत.
(२) कोणताही कळफलक कर्णकुंडल नाही.
(३) सर्व कळफलक कर्णकुंडले आहेत.
(४) १ व ३ दोन्ही

---

५२. या प्रश्नात एक समस्या व त्यानंतर दोन विधाने, I व II दिली आहेत. या विधानांमध्ये असलेले प्रदत्त समस्येचे उत्तर द्यायला पुरेसे आहेत का, ते ठरवा. त्यानंतर दिलेल्या पर्यायांपैकी एक पर्याय निवडून तुमचे उत्तर दर्शवा.

**समस्या :** आनंदला किती भाऊ आहेत?

**विधान I :** त्याच्या आईवडिलांना सात मुले आहेत.

**विधान II :** त्याला जितके भाऊ आहेत, त्याच्या दुप्पट बहिणी आहेत.

(१) एकट्या विधान I मधील प्रदत्त समस्येचे उत्तर देण्यास पुरेसे.

(२) एकट्या विधान II मधील प्रदत्त समस्येचे उत्तर देण्यास पुरेसे.

(३) समस्येचे उत्तर देण्यासाठी दोन्ही विधानांतील प्रदत्ताची आवश्यकता असेल.

(४) समस्येचे उत्तर देण्यासाठी दोन्ही विधानांमधील प्रदत्त अपुरे.

---

५३. राणीने तिची मोटार ४ किमी उत्तरेकडे चालवली. त्यानंतर तिने डावीकडे वळू ५ किमी. पुढे चालवली. नंतर ती तिच्या उजवीकडे वळली आणि तिने ३ किमी चालविली. तर खालीलपैकी कोणत्या मार्गाने मोटार चालविली असता ती तिच्या आरंभबिंदूपाशी परत येईल?

अ. ३ किमी पूर्वेस, ७ किमी दक्षिणेस, २ किमी पूर्वेस

ब. उजवीकडे वळून ५ किमी चालवणे व परत उजवीकडे वळून ७ किमी चालवणे.

क. डावीकडे वळून ५ किमी चालवणे व परत उजवीकडे वळून ७ किमी चालविणे.

(१) फक्त अ (२) अ व ब दोन्ही

(३) ब व क दोन्ही (४) अ व क दोन्ही

---

५४. या प्रश्नात X आणि Y अशी दोन विधाने व I आणि II असे दोन निष्कर्ष दिले आहेत. विधाने व निष्कर्ष यानंतर दिलेल्या पर्यायांपैकी एक पर्याय निवडून तुमचे उत्तर दर्शवा.

**विधान X** : सर्व नर्तक मुली आहेत.

**विधान Y** : सर्व मुली उंच आहेत.

**निष्कर्ष I** : सर्व मुली नर्तक आहेत.

**निष्कर्ष II** : सर्व नर्तक उंच आहेत.

(१) फक्त निष्कर्ष I निघतो (२) फक्त निष्कर्ष II निघतो

(३) दोन्हीपैकी कोणता तरी एकच निष्कर्ष निघतो (४) दोन्हींपैकी कोणताच निष्कर्ष निघत नाही

---

५५. शीला मीनापेक्षा लहान आहे. मीना गौरीपेक्षा वयाने जास्त आहे, पण तिचे वय केशवइतके नाही. पाच मित्रमैत्रिणींमध्ये रमेश वयाने तिसरा मोठा आहे. वयाने सर्वांत लहान कोण आहे?

(१) शीला (२) मीना (३) गौरी (४) अपर्याप्त माहिती

---

५६. या प्रश्नात एक विधान व दोन गृहीतके आहेत. विधान व गृहीतकांनंतर असलेल्या पर्यायांपैकी एक पर्याय निवडून तुमचे उत्तर दर्शवा.

**विधान :** 'चालत्या गाडीत चढू नका', रेल्वे फलाटावरील एक जाहिरात

**गृहीतक I :** चालत्या गाडीत चढणे धोकादायक आहे.

**गृहीतक II :** प्रवासी अशा प्रतिबंधात्मक सूचनांकडे लक्ष देत नाही.

(१) केवळ गृहीतक I अनुस्यूत असेल तर विधान सत्य

(२) केवळ गृहीतक II अनुस्यूत असेल तर विधान सत्य

(३) दोन्हींपैकी कोणते तरी एक गृहीतकअनुस्यूत असेल तर विधान सत्य

(४) दोन्हींपैकी कोणताच अनुस्यूत नसेल तर विधान सत्य

---

५७. पुढे X, Y, Z अशी तीन विधाने आहेत.

(X) एका कारखान्यात ७० कामगार लेथ मशीनवर व ८० कामगार फोर्जिंग मशीनवर काम करतात.

(Y) तीस कामगार लेथ मशीन व फोर्जिंग मशीन दोन्हींवर काम करतात.

(Z) कारखान्यातील प्रत्येक कामगार लेथ मशीन व फोर्जिंग किमान यापैकी किमान एकावर काम करतो.

यावरून पुढीलपैकी कोणता निष्कर्ष खरा आहे?

(१) कारखान्यात शंभर कामगार आहेत.
(२) कारखान्यात ११० कामगार आहेत.
(३) कारखान्यात १५० कामगार आहेत.
(४) कारखान्यात १२० कामगार आहेत.

---

५८. या प्रश्नात X आणि Y अशी दोन विधाने I व II असे दोन निष्कर्ष आहेत. विधाने व निष्कर्ष यानंतर दिलेल्या पर्यायांपैकी एक पर्याय निवडून तुमचे उत्तर दर्शवा.

विधान X : सर्व कैदी गुन्हेगार आहेत.

विधान Y : कोणताही कैदी सुशिक्षित नाही.

निष्कर्ष I : काही सुशिक्षित व्यक्ती गुन्हेगार आहेत.

निष्कर्ष II : काही सुशिक्षित व्यक्ती कैदी नाहीत.

(१) फक्त निष्कर्ष I निघत असेल दोन्ही विधाने सत्य

(२) फक्त निष्कर्ष II निघत तर दोन्ही विधाने सत्य

(३) दोन्हींपैकी कोणता तरी एकच निष्कर्ष निघत असेल तर दोन्ही विधाने सत्य

(४) दोन्हींपैकी कोणताच निष्कर्ष निघत नसेल तर दोन्ही विधाने सत्य

---

५९. जर Q हा P चा मुलगा आहे. T हा S चा मुलगा आहे. Q ने S ची मुलगी असलेल्या R शी लग्न केले आहे, तर S चे Q शी नाते काय?

(१) सासरा
(२) सासू
(३) १ किंवा २
(४) वरीलपैकी कोणतेच नाही

---

६०. अक्षय आणि महेश यांनी एका धावण्याच्या शर्यतीत भाग घेतला. अक्षय शेवटच्या मुलाच्या चार स्थाने पुढे होता. महेशचा शर्यतीत सातवा क्रमांक होता. अक्षय महेशच्या दोन स्थाने पुढे होता. शर्यतीत किती स्पर्धकांनी भाग घेतला होता?

(१) १२ (२) १० (३) ९ (४) अपर्याप्त माहिती

---

६१. एका सांकेतिक भाषेत, अंकांचे संकेतन अक्षरांद्वारे केले आहे. प्रत्येक अक्षर वेगळा अंक दर्शविते. अक्षरांचा अर्थ शोधल्यास (डिकोड केल्यास), पुढीलपैकी कोणता अंक Q चे संभाव्य मूल्य असेल?

```
  P Q R
+ P Q R
+ P Q R
-------
  R R R
```

(१) १ (२) ५ (३) ६ (४) ८

---

६२. एका संकेतभाषेत जर LOT हा शब्द **⁎ΘX** असा दर्शविला असेल, तर COP हा शब्द **ΔX+** असा दर्शविला असेल आणि CAT हा शब्द **Δ□Θ** हा असा दर्शविला असेल तर, CAP हा शब्द कसा दर्शविला जाईल ?

(१) Δ Π + (२) Δ Π X (३) Π + ⁎ (४) ΔXΘ


---

६३. मुलांच्या एका रांगेत मकरंद उजवीकडून तेरावा व डावीकडून पाचवा आहे. त्या रांगेत राजेंद्र डावीकडून सतरावा आहे. मकरंद व राजेंद्रच्या मध्ये किती मुले आहेत?

(१) ११ (२) १२ (३) १३ (४) १४

---

६४. प्रश्नचिन्हाच्या जागी पर्यायी संख्या कोणती?




(१) ६ (२) १८ (३) १२ (४) ३

---

६५. एक इमारत बांधण्यास २० मजुरांना ६० दिवस लागतात. तीच इमारत ८० मजुरांकडून बांधून घ्यायची झाल्यास किती दिवस लागतील?

(१) २० दिवस (२) १५ दिवस (३) २५ दिवस (४) ३० दिवस

---



Study CIRCLE


**सूचना :** प्रश्नक्रमांक ६६ ते ६७ करिता : खालील तालिकेत तीन उत्पादकांच्या एल. सी. डी. टी. व्ही. संचांची चार वर्षातील विक्री दिली आहे. त्यावरून प्रश्नक्रमांक ६६ ते ६७ ची उत्तरे द्या.

| उत्पादक | विक्री (शंभरात) | | | |
|---|---|---|---|---|
| | २००६ | २००७ | २००८ | २००९ |
| A | ६० | ७५ | ७० | १२० |
| B | ५० | ८० | ७५ | १२० |
| C | ९० | ९० | ८० | ९० |

६६. कोणत्या साली ब्रॅण्ड C ची विक्री आधीच्या वर्षाच्या विक्रीच्या तुलनेत सर्वात कमी झाली ?
(१) २००६ (२) २००९ (३) २००८ (४) २००७

६७. सन २००७ मध्ये ब्रॅण्ड B च्या एल. सी. डी. टी. व्ही. विक्रीचा हिस्सा किती टक्के होता ?
(१) १६.२८% (२) ३०.९७% (३) ३२.६५% (४) ७६.०२%


**सूचना :** प्रश्न क्र. ६८ व ६९ खाली दिलेला आलेख एका कंपनीच्या शेअरची पहिल्या नऊ महिन्यांतील किंमत दर्शवितो. त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या.




६८. कुठल्या महिन्यात शेअरची प्रतिशत भाववाढ सर्वांत अधिक होती ?
(१) फेब्रुवारी (२) एप्रिल (३) जून (४) जुलै

६९. आधीच्या महिन्यात चढून पुढच्या महिन्यात किंमत पडणे असे किती वेळा झाले ?
(१) ४ (२) ३ (३) २ (४) १

**सूचना :** प्रश्न क्र. ७० व ७१ खालील पायचार्ट एका कुटुंबाच्या बचतीचा व खर्चाचा तपशील दाखवितो. कुटुंबाचे सन २००६ मधील वार्षिक उत्पन्न रु. २,४०,००० होते. त्यावरून खालील ३ प्रश्नांची उत्तरे द्या.




---

७०. एकूण खर्च केलेल्या रकमेपैकी किती टक्के रक्कम मुलांच्या शिक्षणावर खर्च झाली ?

(१) १०    (२) १२    (३) १५    (४) १८

---

७१. एकूण खर्च केलेल्या रकमेचा कितवा भाग वाहतुकीवर खर्च झाला ?

(१) १/८    (२) १/६    (३) १/१०    (४) १/१२

---


७२ खालील आकृत्यांपैकी प्रॉफिट, डिव्हीडंट व बोनस यांचे सर्वोत्तम नाते दर्शविणारी आकृती कोणती ?



(१)    (२)    (३)    (४)

---

७३. '?' च्या जागी योग्य अक्षर असलेला पर्याय निवडा




(1) N    (2) A    (3) L    (4) M

---

७४. एका कारखान्यात एकूण ५००० मजूर काम करतात. त्यांपैकी ५९ टक्के मजूर कुशल कामावर आहेत. तर कारखान्यातील अकुशल कामगारांची एकूण संख्या किती राहील?

(१) २९५०    (२) २५००    (३) २०५०    (४) २२५०

---

७५. मोहन हा त्याच्या सीता नावाच्या पत्नीपेक्षा ११ वर्षांनी मोठा आहे. सीता हिचे वय तिच्या मुलाच्या ११ पट आहे. जर तिचा मुलगा आजपासून ५ वर्षांनी ९ वर्षे वयाचा होणार असेल तर, मोहनचे आजचे वय किती?

(१) ४४ वर्षे (२) ५५ वर्षे (३) ८१ वर्षे (४) ४९ वर्षे

---

७६. तुम्ही अत्यंत मेहनतीने अनेक सहकाऱ्यांना बरोबर घेऊन एक कल्याणकारी प्रकल्प तयार केला आहे. त्या सर्व प्रकल्पाची माहिती घेण्यासाठी संबंधित खात्याचे मंत्री व इतर अनेक शासकीय अधिकाऱ्यांना तुम्ही निमंत्रित केले असून तुमच्या सर्व सहकाऱ्यांना बरोबर घेऊन तुम्ही या कार्यक्रमाची जय्यत तयारी केली आहे. कार्यक्रमाला काही तासांचा अवधी उरला असतानाच तुमच्या वडिलांना हृदय विकाराचा झटका आल्याचे तुम्हाला समजले असून तुम्हाला त्वरित तुमच्या गावाकडे जावे लागणार आहे. अशा वेळी तुम्ही काय कराल?

अ) तुमच्या सर्व वरिष्ठांना व मंत्री महोदयांना कार्यक्रम रद्द झाल्याचे कळवून तुम्ही तुमच्या गावी जाल.

ब) तुमच्या वरिष्ठांसमोर ही समस्या मांडाल आणि ते सांगतील तसे कराल.

क) या प्रकल्पात ज्यांनी काम केले आहे, अशा तुमच्या एका सहकार्यावर कार्यक्रमाची जबाबदारी सोपवून त्यांना सर्व प्रकारच्या सूचना देऊन तुम्ही गावाकडे जाल.

ड) गावी जाण्यास उशीर झाला तरी हरकत नाही पण तुमचा प्रकल्प मंत्र्यांसमोर सादर झाल्यावरच तुम्ही गावाकडे जाल.

(१) क (२) ड (३) ब (४) अ

---

७७. तुमच्या मित्राला अपघात झाल्याचे कळल्याबरोबर तुम्ही त्वरित तुमच्या दुचाकीवरून त्याच्याकडे जाण्यास घाईघाईने निघाला, तेव्हा तुम्ही हेल्मेट व वाहन परवाना घ्यायला विसरला. रस्त्यात एके ठिकाणी वाहतूक पोलिसांनी तुम्हाला याबद्दल अडविले. अशावेळी तुम्ही काय कराल?

अ. काहीतरी लाच देऊन तुम्ही तेथून निघून जाल.

ब. तुम्ही ज्या परिस्थितीत निघाला तो प्रामाणिकपणे सांगून तुम्ही तुम्हाला सोडून देण्यासाठी पोलिसांना विनंती कराल.

क. तुमच्या ओळखीच्या पोलीस अधिकाऱ्यांना फोन करून पोलिसाने तुम्हाला सोडून देण्यासाठी त्यावर दबाव आणाल.

ड. झालेली चूक मान्य करून योग्य तो दंड भरून तुम्ही तुमच्या मित्राकडे जाल.

(१) ड (२) ब (३) क (४) अ

---

७८. एका मोठ्या नदीवरील पूल कोसळल्याने काही खेडी प्रगत औद्योगिक क्षेत्र असलेल्या मुख्य शहरापासून तुटली आहेत. काही लोक छोट्या होड्या वापरून नदीच्या पलीकडे जाण्यास प्रयत्न करीत असले तरी अशा होड्यांची संख्या फारच कमी आहे. तशात काही दिवस सतत पडलेल्या पावसामुळे नदीच्या पाण्याची पातळी धोक्याच्या पातळीपेक्षा वर चढली आहे. या सर्व खेड्यांमध्ये अन्नपदार्थ, औषधे, कपडेलत्ते या सर्वांचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. एक प्रशासकीय अधिकारी म्हणून तुम्ही आवश्यकतेनुसार खालील गोष्टी कोणत्या क्रमाने कराल?

अ. संरक्षण दलाला बोलवून तात्पुरत्या पूल बांधण्यास सांगणे.

ब. जवळपासच्या इतर ठिकाणांवरून जादा होड्या मागवून घेणे.

क. हेलिकॉप्टर बोलवून त्यातून गरजेच्या वस्तूंचा पुरवठा करणे.

ड. सार्वजनिक बांधकाम खात्याला नदीवर नवा पूल बांधण्यास कळविणे.

(१) अ, ब, क, ड (२) ब, अ, क, ड

(३) क, ब, अ, ड (४) क, ड, अ, ब

---

७९. एक रेल्वे तिकीट निरीक्षक म्हणून तुम्ही एका व्यक्तीला रेल्वेत विना तिकीट प्रवास करताना पकडले आहे. त्या प्रवाशाचे असे म्हणणे आहे की, गाडीत प्रवेश करताना खूप गर्दी होती आणि तेव्हा त्याच्या खिशातील पाकीट कोणीतरी चोरले. त्या पाकिटात त्याचे प्रवासाचे तिकीट होते. अशावेळी तुम्ही कोणत्या क्रमाने त्याच्यावर कार्यवाही कराल?

अ. त्याला नियमाप्रमाणे दंड करून पुढील प्रवासाचे तिकिटाचे पैसे भरायला सांगाल.

ब. पुढील स्टेशन येताच त्या प्रवाशाला तुम्ही पोलिसांच्या ताब्यात देऊन टाकाल.

क. त्याच्या एखाद्या नातेवाईक अगर मित्राला फोन करून पुढील स्टेशनवर पैशांची सोय करण्यास सांगाल.

ड. हा प्रवासी चांगल्या घरातला आहे असे समजल्याने त्याच्या दंडाची रक्कम स्वतःच्या खिशातून भराल व त्याच्या ठिकाणी पोहोचल्यावर त्याला आपली रक्कम परत देण्यास सांगाल.

(१) क, ड, अ, ब (२) क, ब, अ, ड

(३) ड, क, ब, अ (४) अ, ब, क, ड

---

८०. तुम्हाला एका बहुदेशीय कंपनीत मॅनेजर म्हणून तुमच्या गुणवत्तेच्या आधारे नेमले आहे. त्या ठिकाणी तुमच्यापेक्षा ज्येष्ठ अधिकारीही ते अनेक वर्षे या कंपनीत काम करीत असल्याने या पदाची अपेक्षा करीत होते. ते तुम्हाला सहकार्य करीत नाहीत आणि तुम्ही सांगितल्यानुसार काम करीत नाहीत असे तुमच्या लक्षात आले. अशावेळी तुमच्या बाजूने परिस्थिती बदलण्यासाठी तुम्ही खालीलपैकी कोणत्या गोष्टी कोणत्या क्रमाने कराल?

अ. स्वतःच्या कामावर लक्ष केंद्रित करणे, अन्य काय करताहेत याकडे दुर्लक्ष करणे.

ब. तुमच्या सहकाऱ्यांना हे पटवून द्या की तुम्ही सांगितल्याप्रमाणे केल्याने कंपनीचे व पर्यायाने सर्व नोकरांचे हित साधले जाईल.

क. तुमच्या विरोधकांनी काही लोकांना बोलावून त्यांनी तुम्हाला सहकार्य केले, तर पुढील काळात त्यांना पदोन्नती मी मिळवून देईन असे सांगणे.

ड. तुमच्या कंपनीच्या वरिष्ठांना अशा लोकांबाबत तक्रार करणे व त्यांना लेखी खुलासा करण्यास सांगणे.

(१) ड, क, ब, अ (२) ब, क, ड, अ

(३) क, ड, ब, अ (४) अ, ड, क, ब

---

Study CIRCLE